लोकमत

# ‘वेन्सडे वुमनिया’ला सखींचा मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कल्याण :** मेट्रो जंक्शन मॉल आयोजित आणि ‘लोकमत’ सखी मंच यांच्या सहकार्याने संपन्न झालेल्या ‘वेन्सडे वुमनिया’ या कार्यक्रमाला महिलांचा भरभरुन प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात घेण्यात आलेल्या वन मिनिट गेम शो, पावसाची गाणी, नृत्य तसेच ‘फॅशन अंडर अम्ब्रेला’ या स्पर्धेत उपस्थित महिलांनी सहभाग घेत ‘हम भी किसी से कम नही’ हे दाखवून दिले.



‘लोकमत’ सखी मंचतर्फे झालेल्या फॅशन अंडर अम्ब्रेला स्पर्धेतील विजेते.

## स्पर्धेचे विजेते

प्रथम क्रमांक - रुचिता बंड

द्वितीय क्रमांक - मंगला आरोटे

तृतीय क्रमांक - तनुजा पाटील

उत्तेजनार्थ - रोहिणी कोठावदे आणि निवेदिता खासनिस

सध्या पावसाचे दिवस सुरु असून, याच धर्तीवर पूर्वेतील मेट्रो मॉलमधील फूड कोर्टमध्ये बुधवारी सायंकाळी संपन्न झालेल्या ‘फॅशन अंडर अम्ब्रेला’ या स्पर्धेत बदलापूर, कल्याण आणि डोंबिवली परिसरांतील ‘लोकमत’ सखी मंच परिवारातील महिला सभासद तसेच त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या स्पर्धेत विजयी ठरलेल्या महिलांना आकर्षक पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा वारुनगसे यांनी केले. सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.